# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

दूरध्वनी क्र. ०२० - २५६० १२१६
फॅक्स ०२० - २५६० १२०६
website : www.unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे - ४११ ००७
email : st-management@pun.unipune.ac.in

**संदर्भ क्र. :** परीक्षा/व्यवस्थापन/ 1424

**दिनांक :** २७.१२.२०१८

प्रति,
मा. संचालक/प्राचार्य,
सर्व संलग्न संस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
(वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा)

विषय : व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गतच्या **पी.जी.डी.आय.इ.एम, पी.जी.डी.एच.एम, पी.जी.डी.एम.एम, पी.जी.डी.एम.एल.एम, पी.जी.डी.एफ.एस, पी.जी.डी.सी.एम. पी.जी.डी.बी.एम.(२००८,२०१३,पॅटर्न)** अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर/नोंव्हेंबर, २०१८ परीक्षांच्या गुणपत्रकांबाबत......

महोदय/महोदया,

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गतच्या वरील अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर/नोंव्हेंबर, २०१८ परीक्षांचा निकाल जाहीर करण्यात आलेला आहे.

विद्यापीठाशी संलग्नित पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांमधील संस्थांतील/महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची वरील अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर/नोंव्हेंबर, २०१८ परीक्षांची गुणपत्रके गुरूवार, दिनांक २७.१२.२०१८ रोजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळातून (पूर्वीच्या परीक्षा विभागातून) घेवून जावीत.

आपल्या संस्थेमार्फत/महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षांना बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास, विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात न पाठविता, संस्थेच्या/महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत, जेणेकरून त्याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करता येईल.

आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या संस्थेतील/महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची गुणपत्रके वेळेत घेवून जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

आपला,

उपकुलसचिव,